# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०५/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## पोस्टे केळवद हद्दीतील जंगली बोरगाव शिवारातील तलावाचे जवळ अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

दिनांक २१/०५/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे परिसरात प्रोव्हिशन रेडकामी फिरत असताना मुखबिर कडुन विश्वसनिय खबर मिळाली कि, जंगली बोरगाव शिवारातील तलावाचे जवळ १ इसम मोहाफुल हातभट्टी ची दारु गाळत आहे. अशा खबरे वरुन जंगली बोरगाव शिवारातील तलावाचे जवळ मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे– रतनसिंग रमेश राजपूत, वय ३९ वर्ष, रा. छत्रापूर खदाण तह. सावनेर** हा अवैधरीत्या हातभट्टी लावुन मोहाफुल गावठी दारू काढतांना दिसुन आले. दगड विटांचे चुलीवर लोखंडी ड्रम ठेवुन नळी द्वारे मोहाफुल गावठी दारुची रनिंग भट्टी काढतांना आढळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) ०८ नग निळया रंगाचे प्लॉस्टीक ड्रम मध्ये ज्याचे आत प्रत्येकी २०० लिटर मोहाफुल रसायन सडवा असा एकुण १६०० प्रती लिटर २०/–रुपये असा एकुण ३२,०००/–रुपये २) एका प्लॉस्टीक डपकी मध्ये ४० लिटर मोहाफुल गावठी दारु प्रती ५०/– रुपये लिटर प्रमाने एकुन किंमती २,०००/– रुपये ३) ५० किलो मोहाफूल प्रत्येकी ५० रूपये किलो असा एकुण २५०० रूपये ४) निळया रंगाचे ०८ खाली ड्रम प्रत्येकी १०००/– रू प्रमाणे किमंत ८,०००/–रू, ५) ०२ नग लोखंडी ड्रम मध्ये मोहाफुल रसायनने भरलेले उकळते रसायण एकुण १०० लिटर प्रमाणे २०० प्रति लिटर २० रु असा एकुन ४०००/– रू, ६) ०२ नग लोखंडी खाली ड्रम किमती १२०० रूपये एकूण २४०० रूपये ७) ०३ टन जळाऊ लाकुड प्रती टन २,५०० प्रमाने एकुण किंमती ७,५००/–रू ८) ईतर दारू गाळण्याचे साहीत्य पाईप, जर्मन घमेला एकुण ४,०००/– रू असा एकुण किंमती ६२,४००/– रुपयाचा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपी विरुद्ध पो.स्टे केळवद येथे कलम ६५ (एफ), (सी), (ई), (ब) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील ठाणेदार राकेश साखरकर, पोउपनि विलास गेडाम, सफौ किशोर ठाकरे, पोहवा मंगेश धारपुरे, पोशि धोंडुतात्या देवकते पोशि सैफुल्ला खलील अहमद यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर